विद्युत लोकपाल (मुंबई)

(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ९५ / २०२०

वीज जोडणी नसतांना वीज देयके देण्याबाबत

नानासाहेब सोमनाथ सुद्रुक ..... अपिलार्थी

विरुध्द

महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी, अहमदनगर ग्रामीण (महावितरण)..... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- नानासाहेब सोमनाथ सुद्रुक, ग्राहक

प्रतिवादीतर्फे :- मनीषकुमार सुर्यवंशी, कार्यकारी अभियंता, अहमदनगर ग्रामीण

कोरम :- दिपक लाड

ई-सुनावणी तारीख :- १२ जानेवारी २०२१

आदेश पारित दिनांक :- २८ जानेवारी २०२१

आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २००६ (यापुढे ज्याचा उल्लेख 'ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६' असा केला जाईल) मधील विनियम १७.२ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण, नाशिक परिमंडळ, (यापुढे ज्याचा उल्लेख 'मंच' असा केला जाईल) यांच्या दिनांक २८ ऑगष्ट २०२० च्या आदेशाविरुध्द उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २४ नोव्हेंबर २०२० रोजी दाखल केलेले आहे.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

२. मंचाने अपिलार्थी यांचा तक्रार अर्ज क्रमांक ८५/२०१९-२०, दिनांक २८ ऑगष्ट २०२० रोजीच्या आदेशान्वये नामंजूर केलेला आहे.

३. अपिलार्थी ग्राहक यांनी मंचाच्या आदेशाविरूध्द दाखल केलेल्या अभिवेदनात नमुद केले आहे की,

(अ) अपिलार्थी श्री. नानासाहेब सोमनाथ सुद्रुक, मुक्काम पोष्ट - भानसहिवरा, तालुका व जिल्हा - नेवासा, जिल्हा - अहमदनगर, गट क्र.४२२ येथे बोअरवेल कृषीपंप वीज जोडणीसाठी व अर्ज केला व दिनांक २९ नोव्हेंबर २०१० रोजी वीज जोडणीसाठी कोटेशन भरले.

(आ) दिनांक २४ ऑक्टोबर २०११ रोजी महावितरणने वीज जोडणी न करता रू.१२६०/- चे वीज देयक अपिलार्थीस दिले. वीज जोडणी केलेली नाही. अपिलार्थीस जेथुन वीज जोडणी घ्यावयाची आहे, त्या खांबावर दोनच तारा आहेत, त्यावर तिसरी तार नाही, त्यामुळे अपिलार्थीस वीजेचा वापर करता येत नाही. त्यामुळे तिसरी तार टाकन दयावी व वीज वापराचे दिलेले देयक रद्द करावे, असा दिनांक ९ नोव्हेबर २०११ रोजी महावितरण कार्यालय भेंडा येथे अर्ज केला. त्यानंतरही तिसरी तार टाकन दिली नाही, वीज जोडणी करून दिली नाही म्हणून दिनांक २१ फेब्रुवारी २०१२ रोजी याबाबतचा दुसरा अर्ज महावितरणच्या भेंडा कार्यालय येथे दिला.

(इ) वरील दोन्ही अर्ज दिल्यानंतरही तिसरी तार टाकन दिली नाही म्हणून दिनांक ३० नोव्हेंबर २०१२ रोजी अहमदनगर कार्यालय येथे अर्ज दिला. या अर्जानंतर मात्र अपिलार्थी यांना वीज देयक आणून दिले नाही व अपिलार्थी यांना वीज देयके येत नाही असे वाटले. त्यानंतर अनेक वेळा भेंडा व नेवासा अहमदनगार कार्यालयात तक्रार अर्जाबाबत चौकशी केली असता उडवाउडवीची व बेजबाबदारपणाची उत्तरे देण्यात आली.

(ई) दिनांक २८ जानेवारी २०१५ रोजी नेवासा कार्यालयात जाऊन वीज जोडणीबाबत चौकशी केली असता, अपिलार्थीस सिमेंट पोल उपलब्ध झाल्यानंतर तुम्हाला एक पोल देऊन वीज जोडणी देऊ असे आश्वासन दिले, परंतू वीज जोडणी दिली नाही.

दिनांक १ मार्च २०१९ रोजी नेवासा कार्यालय येथे अपिलार्थी यांनी पुन्हा तक्रार अर्ज केला असता, अपिलार्थीचे पहिले कोटेशन रद्द झाले असुन पुन्हा कोटेशन भरण्याबाबत लिहून दिले. वरील प्रकरणाबाबत माहिती अधिकारा अंर्तगत वारंवार माहिती मागितली असता ती सुध्दा मिळाली नाही.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

(उ) वीज जोडणी मिळाली नाही म्हणून दिनांक २० जानेवारी २०१९ रोजी अंर्तगत तक्रार निवारण कक्षाकडे (कक्ष) तक्रार केली. कक्षाकडे नुकसान भरपाईची मागणी केली. कक्षाने सदर गाऱ्हाणे चे कारण १० वर्षापुर्वीचे असल्यामुळे गाऱ्हाणे हे मुदत बाह्य आहे, त्यामुळे अपिलार्थीचे गाऱ्हाणे निकाली काढले. दिनांक २३ मार्च २०२० रोजी अपिलार्थी यांनी अपिलीय अधिकारी अहमदनगर यांच्याकडे माहिती अधिकारा अंर्तगत माहिती मागितली त्यावर दिनांक २८ जुलै २०२० रोजी सुनावणी होऊन १५ दिवसात माहिती दयावी असा निर्णय दिला. तथापि, माहिती मिळाली नाही.

कक्षाच्या आदेशाविरूध्द दिनांक ३ जलै २०२० रोजी नाशिक मंचाकडे तक्रार दाखल केली. दिनांक २८ ऑगष्ट २०२० रोजीच्या आदेशान्वये मंचाने अपिलार्थीचे गाऱ्हाणे फेटाळले आहे. मंचाचा निकाल वेळेत मिळाला नाही व तो मिळावा म्हणून महावितरणच्या कार्यालयात निर्णयाची प्रत मिळावी म्हणून अर्ज केला. दरम्यानच्या काळात महावितरणच्या कर्मचाऱ्याकडुन चार आठ दिवसात अपिलार्थीस वीज जोडणी मिळेल असे समजल, परंतू वीज जोडणी मिळाली नाही.

(ऊ) मंचातील सुनावणीच्या वेळी वीज जोडुन दिली असे खोटे सांगितले म्हणून दिनांक २७ ऑक्टोबर २०२० रोजी विद्युत निरिक्षक, अहमदनगर यांच्याकडे स्थळ तपासणीची मागणी अर्ज केला.

(ए) वीज जोडणी मिळाली नाही त्यामुळे शेतीचे नुकसान झाले आहे. सबब शेतीची नकसानभरपाई मिळावी, तसेच वीज न वापरता जे वीज देयक देण्यात आले ते रद्द करून वीज जोडणी चालु करण्यात यावी अशी मागणी अभिवेदनात केली.

४. प्रतिवादी यांनी २१ डिसेंबर २०२० च्या उत्तरात नमुद केले आहे की,

(क) अपिलार्थी यांनी मुक्काम पोष्ट - भानसहिवरा, तालुका व जिल्हा - नेवासा, जिल्हा - अहमदनगर, गट क्र. ४२२ येथे बोअरवेल कृषीपंपासाठी वीज जोडणीसाठी व अर्ज केला व दिनांक २९ नोव्हेंबर २०१० रोजी वीज जोडणीसाठी कोटेशनमध्ये नमुद केलेल्या रू.५६५०/- रक्कमेचा भरणा केला. प्रतिवादी यांनी नमुद केले की, अपिलार्थी यांना "महावितरण आपल्या दारी" या योजने अंर्तगत वीज जोडणी ग्राहक क्र.१४८२४००५०१२६ अन्वये दिनांक २७ जन २०११ रोजी विना मीटर अश्वशक्ती आधारीत वीज दरा अंर्तगत देण्यात आलो. सदरच्या वीज जोडणीकरीता फक्त एकच पोल लागत असल्यामुळे तात्पुरता केबलद्वारे वीज पुरवठा करण्यात आला.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

(ख) सदर घटना जवळपास दहा वर्ष जुनी आहे, ग्राहकास वीज देयके वेळोवेळी देण्यात आली आहेत. तसेच ग्राहकाने वीज देयकाबाबतची तक्रार केलेली नाही.

(ग) अपिलार्थी यांनी दिनांक २० जानेवारी २०१९ रोजी कक्षाकडे तक्रार केली. कक्षाकडे वीज देयके रद्द करण्याबाबतची मागणी व नुकसान भरपाईची मागणी कली. कक्षाने विनियम ६.६ च्या संदर्भ देऊन सदर गाऱ्हाणे हे मुदत बाह्य आह त्यामुळे तक्रार नामंजुर केली.

(घ) अपिलार्थी यांच्या अर्जा नुसार दिनांक २१ जानेवारी २०२० रोजी त्यांच्या गट क्र ४२२ ची प्रत्यक्ष पाहणी केली असता असे आढळले की, तेथे दोन बोअरवेल असुन एका बोअरवेल मध्ये वीज पंप अस्तित्वात आहे व तीन तारा असलेली वीज लघुदाब वाहिनी सुध्दा आढळुन आली.

(च) अपिलार्थी यांनी मंचाकडे दिनांक ३ जुलै २०२० रोजी नाशिक मंचाकडे तक्रार दाखल केली. दिनांक २८ ऑगष्ट २०२० रोजीच्या आदेशान्वये मंचाने अपिलार्थीचे गाऱ्हाणे फेटाळले.

(छ) प्रतिवादी यांनी नमुद केले की, अपिलार्थी यांची मुळ तक्रार ९ फेब्रुवारी २०११ मधील आहे. ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६ मधील विनियम, ६.६ मधील तरतुद खालीलप्रमाणे आहे :-

> *"ज्या दिनांकास कारवाईचे कारण घडले असेल त्या दिनांकापासुन दोन (२) वर्षाच्या आत जर गाऱ्हाणे दाखल करण्यात आले नाही तर मंचास असे गाऱ्हाणे दाखल करुन घेता येत नाही."*

(ज) प्रतिवादी यांनी नमुद केले की अपिलार्थी ग्राहकाने आपले सन २०११ मधील गाऱ्हाणे दिनांक २४ नोव्हेंबर, २०२० रोजी दाखल केले त्यामुळे वरील तरतूदीनुसार ग्राहकाची तक्रार कालबाह्य होते.

५. कोवीड-१९ मुळे सदर अभिवेदनाची ई-सुनावणी दिनांक १२ जानेवारी २०२१ रोजी व्हिडीओ कॉन्फरंसद्वारे घेण्यात आली. सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षकारांनी युक्तिवाद केला. दोन्ही पक्षांनी आपल्या लेखी निवेदनातील मुद्दे पुनश्चः मांडले.

६. अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान नमुद केले की, त्यांनी वर्ष २०१० मध्ये नवीन शेती पंपाकरीता अर्ज करुन व कोटेशनची रक्कम दिनांक २५ नोव्हेंबर २०१० रोजी भरुनही प्रत्यक्षात वीज जोडणी दिली नाही. परंतू वीज देयके मात्र ऑक्टोबर २०११ पासून देण्यात आली. वीज जोडणी न दिल्यामुळे वीज देयके देण्याचा प्रश्नच येत नाही, सबब, सदरची वीज देयके खोटी असुन ती भरण्यास बाध्य करणे चुकीचे आहे. अपिलार्थी यांना वीज जोडणीसाठी एक पोलची वीज वाहिनी टाकणे गरजचे आहे, परंतू

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

अद्यापही ते काम प्रतिवादी यांनी केलेले नाही. अपिलार्थींच्या शेतात दोन बोअरवेल असुन त्यात कोणी दुसऱ्याने खोडसाळपणे दगड इत्यादी टाकून नुकसान करू नये म्हणून एका बोअरवेल मध्य विद्युत मोटार पंप टाकलेला आहे. सबब, अपिलार्थी यांचे वीज जोडणी अभावी खुप मोठे नुकसान झालेले आहे. तरी प्रतिवादी यांनी दिलेली वीज देयके रद्द करण्यात येऊन अपिलार्थीस योग्य ती नुकसान भरपाई मंजूर करण्यात यावी व वीज जोडणी त्वरीत देण्याचे आदेश देण्यात यावेत, ही विनती.

७. प्रतिवादी यांनी सुनावणी दरम्यान नमुद केले की, अपिलार्थीस दिलेली वीज देयके ही त्यांना शेती पंपाकरीता दिलेल्या वीज जोडणी संदर्भातीलच आहेत शिवाय, पाहणी दरम्यान त्यांच्या शेतात एका बोअरवेलमध्ये वीज मोटर पंप सुध्दा बसविलेला आहे व हे अपिलार्थीने सुध्दा स्वतः मान्य केलेले आहे. सदरची वीज जोडणी देण्याकरीता एक पोलची वीज वाहिनी टाकण्याची गरज आहे. मात्र वीज पुरवठा लवकर व्हावा, या उद्देशाने तात्पुरत्या स्वरूपात सदरची जोडणी केबलद्वारे करण्यात आली. अपिलार्थीने अर्ज केल्यानंतर दिनांक २५ नोव्हेंबर २०१० रोजी पैसे भरण्यासाठी कोटेशन देण्यात आले व त्यात नमुद केलेली रक्कम रू.५६५०/- दिनांक २९ नोव्हेंबर २०१० रोजी भरली. अपिलार्थीस त्यांच्या ५ एचपी च्या शेती पंपाच्या वीज जोडणी करीता दिनांक २७ जन २०११ रोजी वीज पुरवठा करण्यात आला व जन २०११ ते सप्टेंबर २०११ या पहिल्या त्रैमासिकाचे ऑक्टोबर २०११ मध्ये तयार करण्यात आलेले वीज देयक रू.१२८०/- देण्यात आले. त्यावर अपिलार्थीने याबाबतची तक्रार केल्याचे नमुद केले आहे. परंतू त्यासंबधीचा सबळ परावा सादर केला नाही. अभिवेदनासोबत जोडलेलो पत्र हे विश्वासाहर्य वाटत नाहीत. कारण सदरची पत्रे कार्यालयाच्या आवक रजिस्टरमध्ये नोंद झालेली दिसत नाहीत. ऑक्टोबर २०११ मध्ये प्रथम वीज देयके दिल्यानंतर अपिलार्थीने कुठल्याही प्रकारे कक्षाकडे किंवा मंचाकडे तक्रार दाखल केलेली नाही. सबब, सदरचे अभिवेदन फेटाळण्यात यावे.

विश्लेषण व निर्णय

८. सुनावणी दरम्यान दोन्ही पक्षातर्फे करण्यात आलेला युक्तिवाद ऐकला व उपलब्ध केलल्या कागदपत्रांचे अवलोकन केले व खालील बाबींची नोंद घेण्यात आली.

(अ) अपिलार्थीने शेती पंपाच्या वीज पुरवठयाकरीता अर्ज केला होता व त्या अनुषंगाने प्रतिवादीतर्फे देण्यात आलेली कोटेशनमधील उल्लेखीत रक्कम रू.५६५०/- दिनांक २९ नोव्हेंबर २०१० रोजी भरली.

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

(ब) अपिलार्थीतर्फे त्याच्या शेतात असलेल्या दोन पैकी एका बोअरवेलमध्ये त्यांनी वीज मोटरपंप बसविला व तसे त्यांनी आपल्या युक्तिवादात मान्यही केले.

(क) प्रतिवादीतर्फे अपिलार्थीचा शेती वीज पंप जोडणीकरीता एक पोल वाढीव अंतराच्या कक्षेत असल्यामुळे, केबलद्वारे वीज पुरवठा जन २०११ मध्ये करण्यात आला व प्रथम त्रैमासिक रु.१२८०/- चे वीज देयक ऑक्टोबर २०११ मध्ये तयार करून अपिलार्थीस देण्यात आले.

(ड) अपिलार्थीतर्फे या देयकाबाबत किंबहुना प्रतिवादीने वीज पंप जोडणी केली नाही याबाबत कक्ष किंवा मंचाकडे त्वरीत तक्रार नोंदवली नाही.

(इ) अपिलार्थीतर्फे मंचाकडे प्रथम तक्रार दिनांक ३ जुलै २०२० रोजी दाखल करण्यात आली. म्हणजेच २०११ ते २०२० या दहा वर्षाच्या कालावधीत वीज कायदा २००३ व त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या संबंधीत विनियमा अंतर्गत कुठलीही तक्रार दाखल केली नाही. मात्र प्रतिवादी कार्यालयाशी पत्रानव्ये संपर्क केला, असे नमुद केले. सदरची पत्रे पाहता त्यावर विश्वास ठेवणे कठीण आहे.

(ई) अपिलार्थीने बोअरवेलचे नुकसान होऊ नये म्हणून त्यात वीज पंप बसविला हा नमुद केलेला युक्तिवाद अविश्वसनीय वाटतो.

सुनावणी दरम्यान प्रतिवादीस महसुल विभागातर्फे तलाठी कार्यालयामार्फत गट क्र. ४२२ येथील अपिलार्थी यांनी घेतलेल्या पिकांची नोंद घेण्यात येत असलेल्या सात/बाराची (पेरे पत्रकाची) प्रत सादर करण्यास सांगण्यात आल. तलाठयांची स्वाक्षरी असलेला व सादर केलेल्या सात / बारा वरून वर्ष २०१५-२०१६,१६-१७ व १७-१८ मध्ये सदरचे क्षेत्र जलसिंचीत आहे असे दाखविल्याचे दिसते व तसेच ऊस पिकाची सुध्दा नोंदणी दिसते. सदरच्या पिकासाठी व जलसिंचनासाठी वीज पुरवठा उपलब्ध असणे अत्यंत महत्वाचे आहे; याशिवाय सदरची पिके घेणे शक्य नाही. तसेच सुनावणी दरम्यान प्रतिवादी यांना तलाठी कार्यालयाने घेतलेल्या पिकांची कागदपत्रे सादर करण्याचे आदेश दिले, तेव्हा अपिलार्थी यांनी त्यावर कुठलेही भाष्य केले नाही. तसेच हा आदेश पारीत करेपर्यंत तत्संबधी कोणताही खुलासा केलेला नाही. यावरून प्रथमदर्शनी असे दिसते की, अपिलार्थी यांचा युक्तिवाद की, प्रतिवादीने वीज पुरवठा केला नाही हे खरे नाही.

वरील सर्व बाबींचा विचार करीता असे निदर्शनास येते की, अपिलार्थी यांनी त्यांच्या अभिवेदनात अनेक बाबी हेतूपुरस्सर नमुद केल्या नाहीत, यात त्यांचा अंतस्थ हेतू वाटतो. त्याचप्रमाणे त्यांना वीज जोडणी न देता ऑक्टोबर २०११ चे देण्यात आलेले वीज देयक या

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.

बाबतची तक्रार मंचाकडे ३ जुलै २०२० रोजी दाखल केली. ग्राहक गाऱ्हाणे विनियम २००६ मधील विनियम, ६.६ मधील तरतुद खालीलप्रमाणे आहे :-

> *"ज्या दिनांकास कारवाईचे कारण घडले असेल त्या दिनांकापासुन दोन (२) वर्षाच्या आत जर गाऱ्हाणे दाखल करण्यात आले नाही तर मंचास असे गाऱ्हाणे दाखल करून घेता येत नाही."*

या तरतुदी अंतर्गत अपिलार्थीचे गाऱ्हाणे हे कालबाह्य ठरते.

९. सबब, संपुर्ण बाबींचा विचार करीता अपिलार्थीचे अभिवेदन हे फेटाळण्यात येत आहे.

१०. या प्रकरणाच्या अनुषंगाने प्रतिवादी यांना असे आदेश देण्यात येत आहेत की, अश्याप्रकारची अनेक प्रकरणे असण्याची शक्यता नाकारता येत नाही, तेव्हा त्यांनी यासंबधात त्वरीत योग्य ती कार्यवाही करावी व अश्या सर्व ग्राहकांना वीज देयके वितरीत केली जातात की नाही, याची शहानिशा करावी. अश्या सर्व ग्राहकांना मीटरवर वीज पुरवठा कसा त्वरीत सुरू केला जाईल याबाबत वरीष्ठांशो चर्चा करून योग्य त्या उपाययोजना कराव्या. विशेषकरून अपिलार्थी यांचा वीज पुरवठा (ग्राहक क्र.१४८२४००५०१२६) या आदेशाच्या तारखेपासून दोन महिन्याच्या आत चालु करून द्यावा. थकबाकीबाबत प्रतिवादी यानी नियमानुसार कारवाई करावी.

१२. प्रतिवादीने या आदेशाच्या दिनांकापासून आदेशाची पुर्तता केल्याबाबतचा अनुपालन अहवाल दोन महिन्यात सादर करावा.

सही/-
दिपक लाड
विद्युत लोकपाल (मुंबई)

(Dilip Dumbre)
Secretary
Electricity Ombudsman Mumbai

Electricity Ombudsman Mumbai M.E.R.C.